सकाळ दि 02/10/23

# बैल जोडी चोरणाऱ्या चोरांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या

## १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी : टोळीचे यूपी कनेक्शन

सकाळ वृत्तसेवा

नांदेड, ता. १ : सोनखेड (ता.लोहा) शिवारातून बैलजोडी चोरीप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. त्यानुसार पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली असता, बैल जोडी चोरणाऱ्या सहा चोरांच्या मुसक्या आवळण्यास पोलिसांना यश आले आहे. सदर आरोपींना लोहा न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सोनखेड पोलिस ठाण्यात अशोक प्रकाश मोरे (रा. किवळा) यांनी (ता.१४) सप्टेंबर रोजी किवळा शिवारातील शेतीच्या आखाड्यावरून ७० हजार रुपये किंमतीची बैलजोडी चोरीला गेल्याची फिर्याद दिली होती. बिट जमादार वामन नागरगोजे यांनी अधिक तपास केला असता अशाच प्रकारच्या गुन्ह्यातील आरोपी नांदेड जेलमध्ये असल्याचे समजल्यावर रीतसर अर्ज करून अधिक तपासणीसाठी ताब्यात घेतले असता लोहा न्यायालयाने पाच दिवसाची पीसीआर दिला होता. चौकशी दरम्यान पुन्हा न्यायालयासमोर अब्दुल रहीम अब्दुल कुरेशी (वय ३८ रा. बांद्रा ईस्ट मुंबई), सय्यद आदिल सय्यद शफी (वय २५, रा. खडकपुरा नांदेड), मोहमद आझाद सलीम शेख (वय २८, रा. नेपच्यून बिल्डिंड कल्याण मुंबई), नूर महोमद उर्फ ईसा कच्ची (वय २४, रा. अलमरवा बिल्डिंग कच्ची मोहल्ला जुने पनवेल), अब्दुल कलाम अब्दूल सलाम (वय २२, रा. चाकू मार्केट दुमेला पोलिस स्टेशन, कोतवाली रामपूर उत्तर प्रदेश) आणि सय्यद सोहेल सय्यद फारूख (वय ३८, रा. खडकपुरा नांदेड) अशा सहा आरोपींना न्यायालयासमोर हजर केले होते.

न्यायालयाने यातील आरोपी सय्यद आदिल सय्यद शफी व सय्यद सोहेल फारूख दोघेही (रा. खडकपुरा नांदेड) यांना जामीन मंजूर केला असुन इतर चार आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी प्रथम वर्ग न्यायालय लोहा यांनी सुनावली आहे. या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा श्री. नायक यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले व बिट जमादार वामन नागरगोजे यांनी केला.